महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : ३६२ वा | दिनांक : १६/१२/२०२५ | वार : मंगळवार

# मतदार यादीतील दुबार नावांवरून काँग्रेस आक्रमक



**अहिल्यानगर** : राज्य निवडणूक आयोगाने महापालिका निवडणुकांच्या तारखा जाहीर केल्या आहेत. त्यानंतर मतदार यादीवरून राज्य निवडणूक आयोगावर काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांनी टीका केली आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाची मतदार यादी जशीच्या तशी स्वीकारणे हे निकोप लोकशाहीचे लक्षण नाही. मतदार यादीतील अडचणी आधी दुरुस्त करायला हव्या होत्या, मात्र दुबार नावे काढण्याबाबत आधी अधिकार असल्याचे सांगणारा आयोग आता अचानक अधिकार नसल्याचे म्हणत थोरात यांनी टीका केली आहे.

बाळासाहेब थोरात यांनी 10 टक्के गोंधळ जरी असला तरी त्यामुळे किती मतदार वाढले असा सवाल उपस्थित करत डिजिटल युगात दुबार नावे स्पष्टपणे दिसत असतानाही त्यात बदल न होणे म्हणजे कुठल्यातरी रिमोट कंट्रोल खाली निवडणूक प्रक्रिया चालवली जात असल्याचा संशय व्यक्त केला. थोरात म्हणाले, निवडणूक आयोग जे करत आहेत ते निवडणुकीचा पोरखेळ आहे. ब्राझील मॉडेलचा उल्लेख वारंवार केला जातो, मग त्याची अंमलबजावणी किती वेळा केवळ स्टार केले जाणार? असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

या निवडणुकीसाठी 1 जुलै 2025 ची मतदार यादी वापरण्याचा निर्णय आयोगाने घेतला आहे. मतदार यादीत दुबार नावे असणाऱ्या मतदारांच्या नावापुढे डबल स्टार चिन्ह असेल. या मतदारांना कोणत्याही एका मतदान केंद्रावर मतदान करता येईल. संभाव्य दुबार मतदारांच्या घरी जाऊन पाहणी केली जाईल. मुंबईत 10, 111 मतदान केंद्र असतील, असे राज्य निवडणूक आयुक्तांनी म्हटले आहे.

दरम्यान, राज्यातील मुदत संपलेल्या 27 महानगरपालिका तसेच नव्याने निर्माण झालेल्या जालना आणि इचलकरंजी महानगरपालिकांच्या निवडणुकांसाठी राज्य निवडणूक आयोगाने आज घोषणा केली. निवडणूक रणधुमाळी 23 डिसेंबरपासून सुरू होणार असून 15 जानेवारी रोजी मतदान आणि 16 जानेवारी रोजी पुढील प्रक्रिया पार पडणार आहे.

## बोगस मतदार आढळल्यास 'मनसे स्टाईल'ने दणका देणार : संदीप देशपांडे

**मुंबई** : राज्यातील 29 हानगरपालिकांच्या निवडणुकांचा बिगुल वाजताच महाराष्ट्र नवनिर्माण सेना ॲक्शन मोडमध्ये आली आहे. मतदार याद्यांमधील घोळावरून मनसेचे मुंबई अध्यक्ष संदीप देशपांडे यांनी अत्यंत आक्रमक भूमिका घेतली आहे. निवडणूक आयोगाने बोगस मतदारांवर कारवाई केली नसेल, तर आता आम्हीच बघून घेऊ. जिथे बोगस मतदार आढळेल, तिथे त्याला 'मनसे स्टाईल'ने दणका देऊ, असा सज्जड इशारा देशपांडे यांनी दिला आहे.

निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर माध्यमांशी बोलताना संदीप देशपांडे यांनी आपला संताप व्यक्त केला. ते म्हणाले की, मुंबई, नवी मुंबई आणि ठाणे यांसारख्या प्रमुख शहरांमधील मतदार याद्यांमध्ये मोठ्या प्रमाणात बोगस नावे घुसडण्यात आली आहेत. याबाबत मनसेने केवळ आरोप केले नाहीत, तर त्यासंदर्भातील ठोस पुरावेही निवडणूक आयोगाला सादर केले होते. मात्र, दुर्दैवाने आयोगाने त्यावर वेळीच कोणतीही कठोर कारवाई केली नाही. आता थेट निवडणुका जाहीर झाल्या आहेत, त्यामुळे हा घोळ तसाच राहिला आहे.

पुढे बोलताना संदीप देशपांडे म्हणाले, साडे तीन वर्षे झाली, गंगेत घोडं न्हालं. आज निवडणुका, उद्या निवडणुका, चार महिने पुढे असे सुरू असताना आज निवडणुका जाहीर झाल्या ही आनंदाची बाब आहे. पण मतदार यादीत जो घोळ होत तो सोडवण्याच्या आधी तशाच पद्धतीने आपण निवडणुकीला सामोरे जात आहोत. एक निश्चित सांगतो, जिथे आम्हाला बोगस मतदार आढळला, तिथे आम्ही त्याला काय ट्रीटमेंट द्यायची हे राज साहेबांनी सांगितले आहे. तसेच मुंबईचा महापौर हा मराठीच असेल अशी भूमिका घेऊन मराठी माणूस निवडणुकीत उतरेल, असा विश्वास संदीप देशपांडेंनी व्यक्त केला.

दरम्यान राज्यातील 29 महापालिकांसाठी 3 कोटी 48 लाख मतदार मतदान करणार आहेत. या महापालिका निवडणुकांसाठी 1 जुलै 2025 रोजीची मतदान यादी ग्राह्य धरण्यात येणार आहे. ही यादी केंद्रीय निवडणूक आयोगाकडून आली असल्याने त्यामध्ये नावे वगळण्याचे अधिकार राज्य आयोगाला नाहीत असे राज्य निवडणूक आयोगाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

# पुण्यात स्वबळावर लढणार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



**पुणे** : राज्य निवडणूक आयोगाने पत्रकार परिषद घेत आगामी महापालिका निवडणुकांच्या तारखा जाहीर केल्या आहेत. राज्य निवडणूक आयोगाने जारी केलेल्या निवडणूक वेळापत्रकानुसार, 23 ते 30 डिसेंबरपर्यंत उमेदवारांना आपली उमेदवारी दाखल करता येईल. त्यानंतर 31 डिसेंबर रोजी अर्जांची छाननी केली जाईल. 2 जानेवारी 2026 ही उमेदवारी अर्ज मागे घेण्याची तारीख आहे. त्यानंतर दुसऱ्या दिवशी म्हणजे 3 जानेवारी 2026 रोजी अंतिम उमेदवारी यादी जाहीर केली जाईल, तसेच उमेदवारांना निवडणूक चिन्ह वाटप करता येईल. त्यानंतर 15 जानेवारी 2026 रोजी मतदान, तर त्यानंतर दुसऱ्या दिवशी 16 जानेवारी रोजी मतमोजणी होऊन निकाल घोषित होईल. यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

देवेंद्र फडणवीस म्हणाले, राज्य निवडणूक आयोगाने महापालिका निवडणुकीच्या तारखा घोषित केल्या आहेत. 15 जानेवारीला सगळ्या महानगरपालिकांच्या निवडणुका होणार आहेत. या निर्णयाचे आम्ही स्वागत करतो. कारण, राज्यात स्थानिक स्वराज्य संस्था ही प्रशासकांच्या भरवशावर चालवणे हे लोकशाहीला अभिप्रेत नव्हते. तथापि न्यायालयाच्या निर्णयामुळे दीर्घकाळ या संस्था निर्वाचित प्रतिनिधींच्या विना होत्या. आता पुन्हा या निवडणुका होत आहेत आणि आम्हाला विश्वास आहे की या निवडणुकांमध्ये आमच्या शासनाने केले काम पाहता पुन्हा कौल आमच्या बाजूने येईल आणि जनता शहर विकासाची संधी आम्हाला देईल, असा विश्वास फडणवीस यांनी व्यक्त केला.

निवडणुका एकत्र लढणार की स्वबळावर?

महायुती या निवडणुका एकत्र लढणार की स्वबळावर, असा प्रश्न विचारला असता देवेंद्र फडणवीस म्हणाले, आम्ही महायुती करण्याचा प्रयत्न करत आहोत. जास्तीत जास्त ठिकाणी भाजप आणि शिवसेनेची युती होईल, काही ठिकाणी भाजप शिवसेना राष्ट्रवादी युती होईल, एखाद दोन ठिकाणी भाजप-राष्ट्रवादी युती देखील होईल. आता पुण्यात मात्र अजित पवार आणि आमची चर्चा झाली आहे, भाजपने 5 वर्षात चांगल्या पद्धतीने पुण्याचा विकास केला आहे, त्यामुळे कदाचित पुण्यात राष्ट्रवादी आणि भाजप आमने-सामने लढताना तुम्हाला दिसेल. परंतु, ही मैत्रीपूर्ण लढत असणार आहे, असेही फडणवीस यांनी स्पष्ट केले.

पुढे बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, नागपूर महानगरपालिका आणि चंद्रपूर महानगरपालिकेत आरक्षण हे 50 टक्क्यांच्या वर गेले आहे. परंतु, माननीय सर्वोच्च न्यायालयानेच सांगितले आहे की यांच्या निवडणुका घ्या, फक्त जी निकाल असेल तो आमच्या अंतिम निर्णयाच्या आधीन राहील आणि अंतिम निर्णयात जो काही निर्णय घेऊ तो या दोन महानगरपालिकांना लागू होईल, अशी माहिती फडणवीस यांनी दिली.

याद्यांमध्ये घोळ म्हणून निवडणुकाच घ्यायच्या नाहीत असे होऊ शकत नाही

महानगरपालिकेच्या निवडणुकीत शिवसेना सोबत असणार का? असा प्रश्न देवेंद्र फडणवीस यांना विचारला असता ते म्हणाले, शिवसेना शक्य तितक्या ठिकाणी आमच्या सोबत असेल. तसेच मतदार याद्यांमधील घोळावर देखील फडणवीसांनी भाष्य केले. ते म्हणाले, मतदार याद्यांमध्ये अनेक ठिकाणी घोळ आहे, हे आम्ही देखील दाखवले आहे. पण त्यासाठी निवडणुकाच घ्यायच्या नाहीत असे होऊ शकत नाही. गेले 10-25 वर्ष जे निवडणुका लढवत आहेत त्यांना माहीत आहे की कमी अधिक प्रमाणात याद्यांमध्ये घोळ असतोच. आता एसआयआर सुरू झाला आहे, त्यामुळे कदाचित हा घोळ कमी होईल आणि पुढच्या काळात माझे तर मत असे आहे की निवडणूक आयोगाने आपल्या याद्या ब्लॉक चैनमध्ये टाकाव्यात.

सध्या भाजपमध्ये अनेक नेते पदाधिकारी प्रवेश करत आहेत, यावर बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, आमच्या पक्षात येण्याची लोकांमध्ये ओढ आहे. फक्त कोणाला घ्यायचे आणि नाही घ्यायचे याचा निर्णय आमच्या पक्षाचे अध्यक्ष आणि त्या ठिकाणचे प्रमुख नेते घेतील. एक पक्का निर्णय आहे की आमचे आणि शिंदे साहेबांचे ठरले आहे की एकमेकांचे घ्यायचे नाहीत.

ठाकरे बंधू एकत्र आले तरी फटका बसणार नाही

महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे एकत्र येणार असल्याची चर्चा आहे. याचा भाजप तसेच महायुतीला काही फटका बसेल का? या प्रश्नावर उत्तर देताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, दोन्ही ठाकरे एकत्र आले तरी काही फटका बसणार नाही, दोन्ही ठाकरे आणि कॉंग्रेस एकत्र आले तरी काही फरक पडणार नाही. मुंबईकर आमच्या भाजपला आणि महायुतीलाच निवडून देतील. कारण आमचा कारभार, आम्ही केलेला मुंबईचा विकास आणि मराठी माणसाचे आम्ही जोपासलेले हित हे सामान्य मुंबईकरांनी पाहिले आहे. त्यामुळे मुंबईकर आमच्यासोबत राहतील, असा विश्वास फडणवीस यांनी व्यक्त केल.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १६ डिसेंबर २०२५


## "मुले रंगली काव्यात" एकपात्री सांस्कृतिक कार्यक्रम सपन्न



**छत्रपती संभाजीनगर :- ( प्रतिनिधी )** बालभारतीच्या पाठयपुस्तकातील प्रसिध्द कवी अय्युब पठाण लोहगावकर यांनी नुकतेच छत्रपती संभाजीनगर जवळील जटवाडा केंद्रा अंतर्गत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा राहटपटटी तांडा येथील शाळेत दिनांक ११ डिसेंबर रोजी " मुले रंगली काव्यात " हा एकपात्री सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून " कवी आपल्या भेटीला " या उपक्रमातून विद्यार्थी विद्यार्थीना प्रत्यक्ष कवी अय्युब पठाण यांची इयत्ता सहावीच्या अभ्यासक्रमात असलेली " पाणपोई " ही कविता अभिनययुक्त कविता सादर केली. आणि दुसऱ्या सत्रात अय्युब पठाण यांनी त्यांचा गाजलेला धमाल विनोदी एकपात्री सांस्कृतिक कार्यक्रम " मुले रंगली काव्यात " सादर केले. यामध्ये त्यांनी देशभक्तीपर गीते, पोवाडे, भारूडे, पाळणे, विनोदी नकला, गवळणी, हुंडाबंदी गीते सादर करून विद्यार्थी यांचे मनसोक्त मनोरंजनातून अय्युब पठाण यांनी प्रबोधन केले व भरपूर हसविले शेवटी " आई " ही कविता मधूर सुरात गाऊन सादर केली. यावेळी प्रत्यक्ष विद्यार्थी भावुक होऊन रडलेदेखील. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून शाळेचे मुख्याधापक किरण आंबेकर हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून शिक्षक तथा कवी मनोज खुटे हे होते. या कार्यक्रमाला शिक्षक अनिल दाणे आणि परिसरातील पालकवर्ग व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व आभार प्रदर्शन शिक्षक मनोज खुटे यांनी केले. शेवटी कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.

## पठाण जाहेद खान साहेबखान यांना पीएचडी पदवी प्रदान



**छत्रपती संभाजीनगर :** डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर मानव विद्या शाखा अंतर्गत अर्थशास्त्र या विषयातील विद्यावाचस्पती पीएचडी पदवी संशोधन विषय मराठवाड्यातील अन्नप्रक्रिया उद्योग एक अध्यायन या विषयासाठी श्री पठाण जाहेदखान साहेबखान पदवी देण्यात आली या पदवी साठी संशोधनाचे मार्गदर्शक डॉक्टर सय्यदा रुकसाना तबस्सूम, डॉक्टर धनश्री महाजन प्राध्यापक अर्थशास्त्र विभाग डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजी नगर डॉक्टर बालाजी कांबळे प्राध्यापक अर्थशास्त्र विभाग डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय लातूर माने साहेब पीएचडी विभाग डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजी नगर महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक जी श्रीकांत साहेब उपायुक्त तथा शिक्षण विभाग प्रमुख अंकुश पांढरे साहेब शिक्षण अधिकारी भरत तीन गोटे शिक्षण विस्तार अधिकारी रामनाथ थोरे साहेब, कार्यक्रम समन्वयक ज्ञानदेव सांगळे साहेब महानगरपालिका केंद्रीय प्राथमिक व माध्यमिक विद्यालयाचे मुकुंदवाडी मुख्याध्यापक चौधरी साहेब महानगरपालिका प्राथमिक व माध्यमिक विद्यालय चिकलठाणा शाळेचे मुख्याध्यापक प्रभाकर पुंजाबा शिंदे तसेच शाळेचे शिक्षक सर्जेराव वाघ संग्राम सिंग राजपूत वसंत राठोड मनीषा शिंदे रोहिदास काकडे भागेश्वर भुतेकर श्रीकांत ननवरे प्रकाश उन्हाळे रेखा महाजन राखी ढोबळे ज्ञानेश्वर तिवारी लखन उदासी अंकुश काचे सचिन खंदारे तसेच इतर नातेवाईक समीर पठाण साहेब खान पठाण मुस्ताक शेख फरीद शेख सलमान शेख जैद पठाण इम्रान पठाण रिजवान पठाण आजम पठाण अल्ताफ पठाण अफजल पठाण फजल पठाण इरफान इनामदार साहिल कॅम्पुटर बेगमपुरा इत्यादींनी पीएचडीची पदवी मिळाल्याबद्दल शुभेच्छा दिल्या.


दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

जाहिरात दर

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा. संपर्क क्र. 7588005002





महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १६ डिसेंबर २०२५

# छत्रपती संभाजीनगर विभागातून कालिकादेवी विद्यालय रस्सीखेच स्पर्धेत प्रथम...



**शिरूर (का.)** 'महाराष्ट्र शासनाच्या' शालेय शिक्षण व क्रीडा विभाग अंतर्गत क्रीडा व युवक सेवा संचालनालय,महाराष्ट्र राज्य,पुणे.यांच्या अधिनस्त 'छत्रपती संभाजीनगर विभागीय क्रीडा परिषद' आयोजित 'शालेय रस्सीखेच' स्पर्धेचं आयोजन करण्यात आले होते.ही शालेय रस्सीखेच स्पर्धा वयोगट १९ वर्षाखालील मुलींसाठी होती.या स्पर्धेमध्ये, कालिकादेवी विद्यालयाचे प्राचार्य केशव भांगे साहेब यांच्या मार्गदर्शनानुसार मुलींच्या व मुलांच्या अशा दोन्ही संघाने सहभाग नोंदविला होता.या शालेय रस्सीखेच स्पर्धेत छ.संभाजीनगर विभागातील अनेक नामांकित शाळेने सहभाग घेतला होता.मात्र कालिकादेवी विद्यालयाच्या १९ वर्षे वयोगटातील मुलींच्या संघाने 'प्रथम क्रमांक' पटकाविला आहे.तर १७ वर्ष वयोगटातील मुलांनी 'द्वितीय क्रमांक' तर १४ वर्षे वयोगटातील मुलींनी सुद्धा 'द्वितीय क्रमांक' मिळवून बाजी मारली आहे.विद्यालयामधील,क्रीडा शिक्षक श्री रविंद्र बडे व प्रा.बाळासाहेब खटाणे यांनी मुलींच्या व मुलांच्या रस्सीखेच स्पर्धेची तयारी अतिशय मेहनतीने व कौशल्यपूर्ण करून घेतली होती.यामुळे विद्यालयातील मुलींच्या व मुलांच्या संघाने दोन्ही गटात विभागीय स्तरावर शालेय रस्सीखेच स्पर्धेमध्ये 'प्रथम क्रमांक'आणि लहान गटात 'द्वितीय क्रमांक' मिळवून छत्रपती संभाजीनगर विभागात कालिकादेवी विद्यालयाने नाव लौकिक करून दाखविले.यामुळे बीड जिल्ह्यातील व तालुका शिरूर (का.)परिसरातील सर्व क्रीडाप्रेमी यांच्या वतीने विजेत्या खेळाडूंचे अभिनंदन होत आहे.यामुळे कालिकादेवी विद्यालयातील मुलींच्या संघाला तसेच मुलांच्याही संघाला राज्यस्तरीय पातळीवर जाण्याचा मान मिळाला आहे.प्राचार्य केशव भांगे साहेब,उपप्राचार्य प्रा.बसवेश्वर देशमाने,पर्यवेक्षक जनार्दन काळे व सर्व प्राध्यापक, शिक्षक,शिक्षकेत्तर कर्मचारी व सर्व विद्यार्थी यांनी विद्यालयाचे व विजेत्यांचे अभिनंदन केले आहे.

## जाताना इथून माणसा

जातांना इथून माणसा
नको खंत कधी मनाला
होतं काय इथं आपलं
सांग समजावूनी स्वत:ला

रडत रडत आला म्हणुनी
उभे आयुष्य काय रडावे?
हसत हसत जगून घ्यावे
मोहमायेस सोडून द्यावे

बाजार जगाचा शिकून वेड्या
थोडं तरी शहाणं व्हावे
करुनी बाजार आपला
अलगदपणे निघून जावे..

कोणकुणाचा येथे आपुला
क्षुद्र स्वार्थ जगी व्यापला
पैसा आज देव होऊनी
माणसातून हैवान जन्माला

घे जगुनी मस्त जीवन
मायबापाची सावली तोवर
मग कसले घर अन् दार
सारा मोहमायेचा बाजार



**ज्ञानेश्वर गायके, कन्नड**






प्रवेश सुरू
डी.एम.एल.टी.
P.G.DMLT
फिजोओथेरिपी
डिप्लोमा ऑप्थोमेट्री
OT टेक्नीशियन
X-Ray, ECG
रेडीओलॉजी
संपर्क
9405109103

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १६ डिसेंबर २०२५

# विजय दिन : भारतीय शौर्य, एकता आणि आत्मसन्मानाचा गौरव

16 डिसेंबर हा दिवस भारतीय राष्ट्रजीवनात अभिमान, आत्मविश्वास आणि ऐतिहासिक स्मृतींनी भारलेला दिवस आहे. हा दिवस 'विजय दिन' म्हणून साजरा केला जातो. 16 डिसेंबर 1971 रोजी भारताने पाकिस्तानविरुद्धच्या युद्धात निर्णायक विजय मिळवला आणि बांगलादेश या स्वतंत्र राष्ट्राचा जन्म झाला. हा विजय केवळ रणांगणावर मिळालेला लष्करी विजय नव्हता, तर तो भारतीय राष्ट्रशक्तीचा, राजकीय दूरदृष्टीचा आणि मानवी मूल्यांवरील ठाम विश्वासाचा परिणाम होता. म्हणूनच विजय दिन हा केवळ सैन्याच्या शौर्याचा उत्सव नसून, तो संपूर्ण देशाच्या एकतेचा, त्यागाचा आणि आत्मसन्मानाचा ऐतिहासिक साक्षीदार आहे.1971 च्या युद्धाची पार्श्वभूमी समजून घेतल्यास विजय दिनाचे महत्त्व अधिक स्पष्ट होते. तत्कालीन पाकिस्तान भौगोलिकदृष्ट्या दोन वेगळ्या भागांमध्ये विभागलेला होता त्यामध्ये पश्चिम पाकिस्तान आणि पूर्व पाकिस्तान हे दोन भाग होते. भौगोलिक अंतरासोबतच या दोन भागांमध्ये भाषिक, सांस्कृतिक, राजकीय आणि आर्थिक दरी खोल होती. पूर्व पाकिस्तानातील बंगाली भाषिक लोकसंख्या बहुसंख्य असूनही सत्ता, प्रशासन आणि लष्करावर पश्चिम पाकिस्तानचे वर्चस्व होते. पूर्व पाकिस्तानावर सातत्याने अन्याय, भेदभाव आणि दडपशाही केली जात होती. लोकशाही मार्गाने व्यक्त झालेल्या जनतेच्या इच्छेचा अवमान करण्यात आला. या अन्यायाविरोधात उठलेला आवाज दडपण्यासाठी अमानुष अत्याचार करण्यात आले, ज्यामुळे परिस्थिती अधिकच चिघळली होती.या दडपशाहीचा सर्वाधिक फटका सामान्य नागरिकांना बसला. लाखो लोकांची कत्तल झाली, महिलांवर अमानवी अत्याचार झाले आणि असंख्य कुटुंबे उद्ध्वस्त झाली. या भयावह परिस्थितीमुळे सुमारे एक कोटी निर्वासित भारतात आश्रयासाठी आले. हा केवळ सीमावर्ती प्रश्न नव्हता, तर तो भारतासमोरील एक मोठे मानवी आणि राष्ट्रीय आव्हान होते. भारताने या संकटाकडे केवळ शेजारी राष्ट्राचा अंतर्गत प्रश्न म्हणून पाहिले नाही, तर मानवी दृष्टिकोनातून त्याची दखल घेतली. निर्वासितांसाठी अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्यसेवा आणि सुरक्षिततेची व्यवस्था करण्यात आली. या काळात भारतीय समाजाने दाखवलेली करुणा आणि सहिष्णुता ही भारताच्या सांस्कृतिक मूल्यांची साक्ष देणारी ठरली.या परिस्थितीत भारताने युद्धात उतरण्याचा निर्णय घेतला. हा निर्णय सहज किंवा घाईघाईने घेतलेला नव्हता. आंतरराष्ट्रीय पातळीवर अनेक दबाव असतानाही भारताने अन्यायाविरोधात उभे राहण्याची भूमिका घेतली. 3 डिसेंबर 1971 रोजी युद्धाला सुरुवात झाली आणि भारतीय सैन्याने अत्यंत शिस्तबद्ध, नियोजनबद्ध आणि धैर्याने युद्ध लढले. भारतीय लष्कर, नौदल आणि वायुदल यांच्यातील उत्कृष्ट समन्वयामुळे युद्धाची दिशा लवकरच भारताच्या बाजूने झुकली. अवघ्या तेरा दिवसांत युद्धाचा निर्णायक शेवट झाला आणि 16 डिसेंबर 1971 रोजी ढाका येथे पाकिस्तानी सैन्याने शरणागती पत्करली. सुमारे 93 हजार पाकिस्तानी सैनिकांनी शस्त्र खाली ठेवली. आधुनिक युद्धइतिहासातील ही सर्वात मोठ्या शरणागतींपैकी एक मानली जाते.विजय दिन हा भारतीय सैन्याच्या शौर्याचा, शिस्तीचा आणि त्यागाचा गौरव करणारा दिवस आहे. देशाच्या सीमेवर उभे राहून सैनिकांनी आपल्या प्राणांची पर्वा न करता मातृभूमीचे रक्षण केले. अनेक जवानांनी आपले सर्वोच्च बलिदान दिले. त्यांच्या या त्यागामुळेच आज भारत सुरक्षित, स्वाभिमानी आणि सार्वभौम आहे. विजय दिन साजरा करताना या शहीदांचे स्मरण करणे ही प्रत्येक भारतीयाची नैतिक जबाबदारी आहे. त्यांच्या कुटुंबीयांनी सहन केलेला त्याग आणि वेदना कधीही विसरता कामा नयेत.या विजयामागे केवळ सैन्याची ताकद नव्हती, तर संपूर्ण देशाची एकजूट होती. युद्धकाळात देशातील नागरिकांनी अभूतपूर्व संयम आणि राष्ट्रभक्ती दाखवली. राजकीय मतभेद, प्रादेशिक भिन्नता आणि सामाजिक अंतर बाजूला ठेवून संपूर्ण देश एकसंधपणे उभा राहिला. उद्योगधंदे, शेतकरी, कामगार, आरोग्य कर्मचारी, माध्यमे आणि सामान्य नागरिक यांनी आपल्या परीने राष्ट्रहितासाठी योगदान दिले. ही एकजूटच भारताची खरी ताकद आहे, हे 1971 च्या युद्धाने स्पष्टपणे दाखवून दिले.विजय दिन हा भारताच्या राजकीय परिपक्वतेचेही प्रतीक आहे. युद्ध जिंकल्यानंतर भारताने अहंकार, सूडभावना किंवा आक्रमक धोरण स्वीकारले नाही. युद्धकैद्यांशी आंतरराष्ट्रीय नियमांनुसार मानवी वागणूक देण्यात आली. शिमला कराराच्या माध्यमातून शांततेचा आणि संवादाचा मार्ग स्वीकारण्यात आला. ही भूमिका भारताच्या शांततावादी आणि जबाबदार राष्ट्र म्हणून असलेल्या प्रतिमेला अधिक बळ देणारी ठरली. सामर्थ्य असूनही संयम राखणे आणि स्थैर्याला प्राधान्य देणे, हीच भारताची खरी ओळख आहे.आजच्या काळात विजय दिनाचे महत्त्व अधिक व्यापक स्वरूपात समजून घेण्याची गरज आहे. जागतिक पातळीवर वाढते संघर्ष, युद्धसदृश परिस्थिती आणि अस्थिरता पाहता 1971 चा विजय आपल्याला आत्मविश्वास देतो. तो आपल्याला आठवण करून देतो की, भारत कोणत्याही संकटाला समर्थपणे सामोरे जाण्याची क्षमता राखतो. विजय दिन हा केवळ भूतकाळाचा गौरव नसून तो वर्तमान आणि भविष्याचा आत्मविश्वास आहे.विजय दिन युवकांसाठी विशेष प्रेरणादायी ठरतो. आजचा युवक उद्याचा भारत घडवणार आहे. या दिवसातून त्याला देशप्रेम, कर्तव्यनिष्ठा, शिस्त आणि त्यागाची शिकवण मिळते. सैन्यात भरती होणे हीच देशसेवा नाही, तर प्रामाणिकपणे आपले कर्तव्य बजावणे, समाजात सकारात्मक बदल घडवणे आणि राष्ट्रीय एकतेचे जतन करणे हेही देशसेवेचेच स्वरूप आहे. विजय दिन युवकांमध्ये जबाबदारीची जाणीव जागवतो.विजय दिन साजरा करताना तो केवळ औपचारिक कार्यक्रम, परेड किंवा भाषणांपुरता मर्यादित ठेवू नये. स्वातंत्र्य, सुरक्षितता आणि सार्वभौमत्व सहज मिळालेले नसून त्यासाठी असंख्य बलिदानांची किंमत मोजावी लागलेली आहे, याची जाणीव प्रत्येक नागरिकाने ठेवली पाहिजे. राष्ट्राच्या एकतेला, अखंडतेला आणि सुरक्षिततेला बाधा पोहोचवणाऱ्या शक्तींविरोधात सजग राहणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे.विजय दिन हा भारतीय इतिहासातील एक सुवर्णक्षण आहे. हा दिवस आपल्याला अभिमानाने मान उंचावायला शिकवतो, पण त्याचबरोबर जबाबदारीची जाणीवही करून देतो. शौर्य, शिस्त, एकता आणि शांततेचा संदेश देणारा विजय दिन प्रत्येक भारतीयाच्या मनात राष्ट्रप्रेम अधिक दृढ करतो. 16 डिसेंबर हा दिवस केवळ स्मरणाचा नसून संकल्पाचा दिवस आहे. भारताच्या सुरक्षित, समृद्ध आणि सशक्त भविष्यासाठी एकजुटीने पुढे जाण्याचा संकल्प करण्याचा दिवस आहे. म्हणूनच विजय दिन हा भारतीय शौर्याचा, आत्मसन्मानाचा आणि इतिहास घडविणाऱ्या विजयाचा अमर उत्सव आहे.



**डॉ. राजेंद्र बगाटे**
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)
केवळ संदेशासाठी मो. 9960103582,
bagate.rajendra५@gmail.com